बीड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील भूगोल विषयाच्या अध्यापनात सहल अध्यापन पध्दतीच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र पीएच.डी. पदवीच्या अंशतः पूर्ततेसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

होळकर आशालता जगन्नाथ (भारजकर)

एम.ए. (भूगोल, इतिहास) एम.एड्. सेट (शिक्षणशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. शिराढोणकर पी.एल.

रावसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, पाचपिंप्री

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

वर्ष

२०१८-१९

१. प्रस्तावना :

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय तो जिवंत राहू शकत नाही. परंतु मानव हा समाजप्रिय पेक्षा भूगोल प्रिय प्राणी आहे. अन्न,वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. यात महत्वाची गरज पाणी व अन्न हे मानवास कोठून मिळते याचे उत्तर देण्याची क्षमता फक्त भूगोल विषयात आहे.

शालेय अभ्यासक्रमात अनेक विषय समाविष्ट करण्यात आले. त्यात भूगोल हा सामाजिकशास्त्र या शीर्षकाखाली येतो. इतिहास, भुगोल, नागरिकशास्त्र, माध्यमिक स्तरावर ७५ गुणांसाठी व अध्यापन तासिका आठवड्यातून दोन. मात्र मानवाला समृध्द करणारा विषय म्हणजेच भूगोल. मात्र भुगोल विषयासारखा महत्वपूर्ण विषय हा कोणतीही अधपन तयारी न करता शिकवला जातो.

भूगोलाचा अनेक शास्त्रांशी संबंध येतो आणि भूगोलाला 'शास्त्रपांशास्त्रम' असे म्हटले जाते. भूगोलाच्या अभ्यासाशिवाय मानव आपले जीवन व्यतित करु शकत नाही. परंतु माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात भूगोल विषयाच्या अध्यापनात शिक्षक किती प्रमाणात शैक्षणिक साहित्याचा व विविध अध्यापन पध्दतीचा वापर संबोध स्पष्ट करण्यासाठी सूत्र व तंत्राचा वापर करतात. विविध अध्यापन पध्दतीचे वापर का करत नाहीत ? यासाठी उपाय शोधता येतील का ? यासाठी संशोधक यावर संशोधन करीत आहे. विद्यार्थ्यांचे सर्वच शिक्षण शाळेच्या चार भिंतीत होत नाही. भूगोल विषयातील संबंधाचे निरीक्षण वर्गाच्या बाहेर जाऊन करावे लागते. डोंगररांगा, टेकड्या, घाट, दरी, शेती, उद्योगधंदे, रस्ते इ. संबोधाची पाहणी प्रत्यक्ष मुलांनी निरीक्षणाद्वारे केल्यास मुलांच्या संकल्पना दृढ होतात. त्यासाठी सहलीची तपशीलवार योजना करावी लागते. सहल अध्यापनातून प्रत्यक्ष अनुभवामुळे मुलांचे ज्ञान अधिक दृढ होते व स्वयंशिक्षणाला चालना मिळते.

2. संशोधन समस्येची गरज :

मानवाचा विकास त्याच्या ज्ञानार्जन व संशोधनासाठी केलेल्या सततच्या प्रयत्नामुळे शक्य झाला आहे. सर्वांसाठी प्रभावी शिक्षण ही वेगळी संकल्पना आहे. शिक्षणाच्या हेतुनुसार,

उद्दिष्टानूसार शिकणाऱ्यामध्ये प्रत्यक्ष बदल होतात. तेव्हाच ते शिक्षण प्रभावी ठरते. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाण् व गतिप्रमाणे शिकण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन व ग्रहण क्षमतेत अपेक्षित बदल घडवून आणावयाचा असेल तर शिक्षकांनी आपल्या अध्यापनात विविध अध्यापन पध्दतींचा वापर करणे आवश्यक ठरते.

सर्वसाधारणपणे भूगोलामध्ये अध्यापन करण्यासाठी सहल, प्रवास, तुलनात्मक चर्चा प्रकल्प इ. पध्दतींचा अवलंब करणे अपेक्षित आहे. परंतु आज भूगोलाचे अध्यापन कथन पध्दतीने होते. त्यामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष अनुभवापासुन वंचित राहतो. त्यामुळे निरीक्षण शक्ती, विचार शक्ती, निर्णय शक्ती इ. कौशल्याचा विकास होत नाही. या कौशल्याचा विकास करण्यासाठी त्यांना विविध अध्यापन पध्दती शैक्षणिक अनुभूतींचा वापर अध्यापनात करावा लागेल. भूगोल विषय गुणासाठी न शिकविता विद्यार्थ्यांत निरीक्षणशक्ती व विविध कौशल्य विकसित करण्यासाठी भूगोल विषयाचे अध्यापन प्रभावी व्हावे असे संशोधकाला आवश्यक वाटते. त्यासाठी सहल अध्यापन पध्दतीच्या वापरामुळे काय फरक पडतो. हे पाहण्यासाठी हे संशोधन कार्य हाती घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना भूगोल विषयाचे अध्ययन करतांना आशयज्ञानप्राप्तीमध्ये कोणत्या समस्या येतात, त्या दूर करण्यामध्ये शिक्षकाची भूमिका संबोध, संकल्पना आकलनादरम्यान शिक्षकाने कोणत्या अध्यापन पध्दतीचा उपयोग करावा. पुस्तकात वाचलेल्या गोष्टीचे सहलीच्या माध्यमातून पडताळा घेता येतो. विद्यार्थ्यांच्या भूगोलातील संबोध स्पष्ट होतात व चूकीच्या कल्पना सहल अध्यापनाद्वारे नष्ट होण्यास मदत होते. मुलांची निरीक्षणक्षमता सहकार्य व सामुदायिक जीवनाची आवड निर्माण होण्यासाठी याचा उपयोग होतो. विद्यार्थ्यांची चिकित्सात्मक वृत्ती, तुलनात्मक अभ्यास करण्याची वृत्ती यामध्ये वाढ होण्यासाठी सहल अध्यापन पध्दतीची गरज निर्माण झालेली आहे. सहलीच्या माध्यमातून मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांच्या कायम स्वरुपी लक्षात राहणार आहे. त्यामुळे हे संशोधन हाती घेण्यात आले आहे.

या संशोधनाची आणखी एक गरज म्हणजे यापूर्वी अशा प्रकारचे संशोधन भूगोल विषयासाठी बीड जिल्ह्यात झालेले नाही.

3. समस्येचे महत्व :

बीड हा मराठवाड्यातील जिल्हा. मराठवाडा अनेक बाबतीत, शिक्षणातही मागासलेला आहे. अध्ययन अध्यापनात अनेक अडचणी आहेत. राष्ट्रप्रेम, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, भूगोलाच्या अभ्यासानेच वाढीव लागले. इतिहासातील अनेक युध्दांचे यश भौगोलिक संरचेनेच्या अभ्यासामुळे शक्य झाले आहे. भूगोलाच्या अभ्यासामुळे अन्न, वस्त्र, निवारा, व्यवसाय, वाहतुक मार्ग या बाबी अवलंबुन असूनदेखील या विषयाकडे परिक्षेपुरतेच बघितले जाते म्हणून संशोधकाने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

भूगोल अध्यापकांमध्ये अध्यापनाविषयी जाणिवजागृती निर्माण होईल व त्यांना निश्चित दिशा मिळणार आहे. शिक्षकांना आपल्या अध्यापनात आशयानुरुप पध्दती वापरणे, विविध प्रयोग करण्याची उर्मी जागृत होणार आहे. भूगोल अध्यापनातील सहल अध्यापन पध्दतीचा वापर व येणाऱ्या समस्यांचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. या संशोधनामुळे भूगोलातील आणखी कोणकोणत्या बाबीवर संशोधन होणे गरजेचे आहे हे समजणार आहे. परिणामी भूगोल अध्यापनाची उद्दिष्टे साधण्यास सक्रिय व संशोधनावर आधारित असा हातभार लागू शकणार आहे. भूगोल शिक्षकांनी प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी सहलीचे आयोजन केले पाहिजे.

4. संशोधनाची उद्दिष्टे :

1. भूगोल विषय अध्ययन अध्यापनात शिक्षक आशयज्ञान स्पष्टीकरणात येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
2. भूगोल विषय अध्यापनात अध्यापन पध्दतीसंबंधी येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
3. भूगोल विषय अध्ययन अध्यापनात सहशालेय उपक्रमांचे आयोजन करण्यात येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
4. भूगोल विषय अध्ययन अध्यापनात भौगोलिक अभिरूची संदर्भात येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
5. भूगोल विषयाच्या अध्यापनात शिक्षकांकडून वापरल्या जाणाऱ्या विविध अध्यापन पध्दतीचा अभ्यास करणे

6. भूगोल अध्यापनात विद्यार्थ्यांच्या घेतल्या जाणाऱ्या कृतियुक्त सहभागाविषयी माहिती मिळविणे.

5. संशोधनाची गृहीतके :

1. माध्यमिक स्तरावरील सर्व शाळांमध्ये इयत्ता नववीसाठी भूगोल हा विषय अनिवार्य म्हणून शिकविला जातो.
2. माध्यमिक स्तरावर शिक्षकांनी आपल्या अध्यापनात पाठ्य घटकानुसार अध्यापन पध्दती वापरणे आवश्यक असते.
3. अध्यापनात विविध पध्दती न वापरल्याने विद्यार्थ्यांना भूगोल विषयातील आशय समजण्यास व लक्षात ठेवण्यास अवघड जाते.
4. शिक्षक विद्यार्थ्यांचे अर्थपूर्ण अध्ययन होण्यासाठी आवश्यक तेवढे प्रयत्न करीत नाहीत.
5. विद्यार्थी भूगोलातील संकल्पना/संबोध यांचे आकलन न करता पाठांतर करतात.
6. चांगल्या प्रकारे अध्ययन निष्पत्ती साधण्यासाठी सहल अध्यापन पध्दती अनुरुप वातावरण उपलब्ध करुन देतात.
7. सहल अध्यापन पध्दतीच्या सहाय्याने आशय सुस्पष्ट आणि जास्त काळ लक्षात राहतो. त्यात प्रत्यक्ष अनुभव असल्याने धारणा शक्ती जास्त असते.

6. संशोधनाची व्याप्ती :

1. सदरील संशोधनात बीड जिल्ह्याचा समावेश आहे.
2. सदरील संशोधन भूगोल विषयाशी संबंधीत आहे.
3. सदरील संशोधन हे माध्यमिक शाळेशी संबंधीत आहे.
4. सदरील संशोधनात भूगोल अध्यापनात सहल पध्दतीचा विचार करण्यात येणार आहे.

7. संशोधन परिकल्पना :

1. भूगोल विषय अध्ययन अध्यापनात आशयज्ञान स्पष्टीकरणात समस्या उद्‌भवतात.
2. भूगोल विषय अध्ययन-अध्यापनात अध्यापन पध्दती संबंधी समस्या उदभवतात.
3. भूगोल विषय अध्ययन अध्यापनात अभिरुची संदर्भात समस्या उदभवतात.

4. भूगोल शिकवतांना विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घेतला तर त्यांना तो भाग दिर्घकाळ लक्षात राहिल.

8. संशोधन मर्यादा :

1. सदरील संशोधन हे फक्त बीड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.
2. सदरील संशोधन हे माध्यमिक स्तरापुरतेच मर्यादित आहे.
3. सदरील संशोधन हे माध्यमिक स्तरावरील भूगोल विषयापुरतेच मर्यादित आहे.
4. या संशोधनामध्ये भूगोल अध्यापनात सहल अध्यापनाचा विचार करण्यात येणार आहे.

9. समस्या विधानातील परिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या :

♦ **बीड जिल्हा :**

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील बीड हे एक जिल्ह्याचे ठिकाण आहे. या जिल्ह्यात 11 तालुक्यांचा समावेश होतो. बीड जिल्हा हा ऐतिहासिक काळात अस्माक म्हणून ओळखला जात असे. हैद्राबाद राज्य निजामाच्या अंमलाखालून स्वतंत्र झ ाल्यानंतर 1956 साली बीड जिल्हा मुंबई राज्याच्या आणि त्यानंतर 1960 साली महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद महसूल विभागामध्ये केंद्रस्थानी असलेला बीड जिल्हा हा 1930 ते 1930 उत्तर अंशामध्ये आणि 75.50 ते 75.50 पूर्व रेखांषामध्ये वसलेला आहे.

या जिल्ह्याला ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून संबोधले जाते. या जिल्ह्यात प्रसिध्द गणितज्ञ भास्कराचार्य यांचा जन्म झाला. 1 मे 1960 रोजी या जिल्ह्याला महाराष्ट्र राज्यात समाविष्ट करण्यात आले. बीड जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व जालना हे जिल्हे, वायव्य, पश्चिम, नैऋत्य बाजूस अहमदनगर व उस्मानाबाद हे जिल्हे आणि आग्नेय पूर्व व ईशान्य बाजूस लातूर व परभणी हे जिल्हे आहेत. बीड जिल्ह्याचे तीन स्वाभाविक विभाग पडतात. उत्तरेस गोदावरी खोऱ्यातील सब्बल प्रदेश, दक्षिणेकडे बालाघाट, डोंगर गंगा, उंचावरील सपाट प्रदेश आणि उर्वरित कमी अधिक उंचीचा डोंगरटेकड्यांच्या उताराचा हा सीमा खोऱ्यांचा भाग आहे.

- **इयत्ता 9 वी :**

  1 ली ते 8 वी पर्यंत प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर माध्यमिक स्तरावरील पहिला वर्ग

- **भूगोल :**

  शालेय विषयातील अनिवार्य अभ्यास विषयांपैकी एक विषय.

- **अध्यापन :**

  विषयातील माहिती, ज्ञान, विद्यार्थ्यांना समजण्यासाठी केले जाणारे प्रयत्न, अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे, मार्गदर्शन करणे, दिशा देणे, प्रोत्साहन देणे.

- **सहल अध्यापन पध्दती :**

  प्रत्यक्ष एखाद्या ठिकाणी जाऊन निरीक्षण नोंदणी व अभ्यास करणे होय. प्रत्यक्ष प्रवासाला जाऊन भौगोलिक निरीक्षणाद्वारे माहिती मिळविणे.

- **परिणामकारकता :**

  सहल अध्यापनाचा उपयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीत होणारा लक्षवेधक घनात्मक बदल.

- **चिकित्सक अभ्यास :**

  एखाद्या विषयाचा सूक्ष्म, सांगोपांग सर्व अंगानी केलेला साधकबाधक अभ्यास.

10. कार्यपध्दती :

या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधनातील सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, पडताळा सूची या साधनांचा वापर केला जाणार आहे. माहितीच्या अर्थ निर्वचनासाठी सरासरी व टक्केवारी या सांख्यीकीचा वापर केला जाणार आहे.

11. प्रकरणांची रचना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने संशोधनाची माहिती कशाप्रकारे मांडली जाणार आहे याचा अल्पसा परिचय या घटकात केला आहे.

प्रकरण १ : संशोधनाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, गृहीतके, व्याप्ती व मर्यादा

प्रकरण २ : संबंधीत संदर्भ साहित्याचा आढावा.

प्रकरण ३ : संशोधन पध्दती, संशोधनाची साधने व तंत्रे नमुना निवड

प्रकरण ४ : माहितीचे संकलन, माहितीचे विश्लेषण, कोष्टकीकरण व अर्थनिर्वचन

प्रकरण ५ : संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी.

समारोप :

प्रस्तुत संशोधन समस्येविषयी अधिकाधिक माहिती मिळवून त्यासंबंधीचे सर्व वैशिष्टे प्रस्तुत संशोधात आणली आहेत. तसेच या प्रकरणांचा एकूण अभ्यास केल्यानंतर संशोधन विषयाची ओळख अभ्यासकाला होईल असे संशोधकाला वाटते. संशोधन विषयाची गरज, महत्व, संशोधनाचे शीर्षक, शीर्षकातील संज्ञांचे स्पष्टीकरण, उद्दिष्टे, गृहीतके, न्यादर्श संशोधनाची व्याप्ती व मर्यादा या गोष्टीच्या आधारे एकूण संशोधनाची ओळख अभ्यासकाला व्हावी हाच या प्रकरणामागील संशोधकाचा हेतू आहे.

११. संदर्भग्रंथ सूची :

१. बेडगे अ.मु. (जुन २००८) जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शन, पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

२. भिंताडे वि.रा (२००७), शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नित्य नुतन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

३. डॉ. भोसले रमा व डॉ. डोळे उज्वला, शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, पुणे, फडके प्रकाशन.

४. दांडेकर वा.ना. (१९८९) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र पुणे विद्या प्रकाशन.

५. घोरमोडे के.यु. (२००९) शिक्षकांचे शिक्षण, नागपूर, विद्याप्रकाशन.

६. जगताप ह.ना. (२००८), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे नित्य नुतन प्रकाशन.

७. डॉ. सौ. पाटील व्ही.एन. व प्रा. चट्टे (२०१०) जीवन कौशल्यासाठी शिक्षण (लेख) शिक्षण संक्रमण अंक (१ जानेवारी २०१०)

८. उपासनी ना.के. यशस्वी अध्यापन पुणे, श्री विद्या प्रकाशन.

९. Dr. Kallave G. Manesh, Mr. Shinde S. Jitendra, Life skill Education, Nanded, Prathmesh Prakashan.

१०. Life skill Education & CCE-Class IX & X-central Board of Secondary Education.